# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना कमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वे दिनाक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम कमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## परिक्षा व मुल्यमापन मंडळ विभाग

कॉम्पलेक्स परिसर,एम.आय.डी.सी. रोड, गडचिरोली–४४२६०५

दूरध्वनी कमांक:कार्यालय: ०७१३२–२२३३२०

ईमेल :director.boee@unigug.ac.in


जा. क्र. गों.वि./परिक्षा वि./917/२०२५

दिनांक : 05/०३/२०२५

## परिपत्रक

**विषय:**–शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करीता उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारीतील सर्व अकृषी विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यांसाठी कॅरी ऑन सुविधा उपलब्ध करणेबाबत.

**संदर्भ:**–शासन निर्णय आदेश क्र. संकीर्ण–२०२५/ ई–९७०२२०/विशि–३ मंत्रालय मुंबई दिनांक १० फेब्रुवारी २०२५.

उपरोक्त विषयाच्या अनूषंगाने गोंडवाना विद्यापीठाच्या अखत्यारीत येणाऱ्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राचार्य व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, १) प्रथम वर्षामध्ये अनुत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना तृतीय वर्षाच्या ५ व्या सत्राकरीता, व्दितीय वर्षामध्ये अनुत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना चतुर्थ वर्षाच्या ७ व्या सत्राकरीता तसेच वरील वर्गात प्रवेश देण्याची पात्रता ही सम सत्र २०२३–२४ (म्हणजे उन्हाळी परीक्षा २०२३–२४) च्या परीक्षांच्या निकाल ऐवजी विषम सत्र २०२४–२५ (म्हणजे उन्हाळी परीक्षा २०२४–२५) च्या निकालांवर राहील.

२) अशा प्रकारे पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्ष २०२४–२५ च्या विषम (हिवाळी) व सम (उन्हाळी) सत्राच्या परीक्षा एकत्रित सम सत्राच्या परीक्षांसोबत घेण्यात येईल.

३) अशा प्रकारे वरील वर्गात प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचे विषम सत्राचे अभ्यासक्रम पुर्ण करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची असेल आणि यासाठी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाकडे आवश्यक हमीपत्र भरून द्यावे लागेल.

ज्या अभियांत्रिकी महाविद्यालयांचे शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करीता Carry on ची सुविधा त्यांच्या विद्यार्थ्यांना यापुर्वीच दिली असेल, अशा महाविद्यालयांना सदर निर्देश लागु असणार नाहीत.

सदर निर्देश अत्यंत अपवादात्मक परिस्थितीमध्ये केवळ शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करिता लागु राहतील व या निर्देशांचा संदर्भ पुढील वर्षामध्ये घेता येणार नाही. यांची संबंधीतांनी याची नोंद घ्यावी.

05/03/2025

मा. संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

Scanned with OKEN Scanner